वरं जनहितं ध्येयम्
(पुणे महानगरपालिका)

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ 3399
दिनांक :१५ /०७/२०२१

# आदेश

विषय:- कोरोना विषाणू (कोविड - १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी " Levels of Restrictions for Breaking the Chain " प्रतिबंधात्मक आदेश.

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०,२१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०,३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०,३० सप्टेंबर २०२०,१४ ऑक्टोबर २०२०,२३ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०,२१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, १० फेब्रुवारी २०२१,१५ मार्च २०२१,१७ मार्च २०२१, २७ मार्च २०२१, ४ एप्रिल २०२१,१३ एप्रिल २०२१,२० एप्रिल २०२१, २१ एप्रिल २०२१, २९ एप्रिल २०२१,१२ मे २०२१,३० मे २०२१, ४ जून २०२१, १० जून २०२१,२५ जून २०२१
५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०, २९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१,दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१, ८३०८,दि.२१.०२.२०२१, ८५७७,दि.२८.०२.२०२१, ९०५२,दि.१२.०३.२०२१, ९१४४, दि.१६.०३.२०२१, ९३११,दि.२०.०३.२०२१, ९५३१ दि.२६.०३.२०२१,९५४५, दि.२७.०३.२०२१, ५८, दि.०२.०४.२०२१, ८९, दि. ०५.०४.२०२१, ११३, दि. ०६.०४.२०२१, २४०, दि. ०९.०४.२०२१, ३००, दि. १४.०४.२०२१, ४०७, दि.१७.०४.२०२१, ४८९, दि. २०.०४.२०२१, ५२३, दि २२.०४.२०२१, ८३९, दि.३०.०४.२०२१, १२८०,दि.१४.०५.२०२१, १२८२ दि.१४.०५.२०२१, १७६५, दि.२८.०५.२०२१, १८१८ दि.३१.०५.२०२१, १९९० दि.०५.०६.२०२१, २१८५ दि.११.०६.२०२१, २३९३ दि.१८.०६.२०२१, २७१३ दि.२६.०६.२०२१, २९७३ दि.०२.०७.२०२१

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन–१९५०
EST.1950

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी राज्यातील कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्याकरिता प्रसारणाची साखळी प्रभावीपणे खंडित करण्यासाठी लावलेले निर्बंध जिल्हानिहाय / प्रशासकीय युनिटनिहाय शिथिल करणे तसेच विविध आर्थिक आणि सामाजिक उपक्रम नियोजनबद्ध सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये** कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी इकडील दिनांक २६.०६.२०२१ व दि ०२.०७.२०२१ रोजी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांचे नियमित वर्ग दिनांक ३१ जुलै २०२१ पर्यंत पूर्णतः बंद राहतील. मात्र ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील.

३) सदर आदेश हे पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येणाऱ्या पुणे कटक मंडळ व खडकी कटक मंडळ यांना देखील लागू राहतील.

४) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि.१६.०७.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.१५ .०७.२०२१ रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५० EST.1950

Vikram

( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित...